# ग्रामीण कृषि मौसम सेवा

## डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभाग



ईमेल – gkmsakola@yahoo.com


**यवतमाळ जिल्हा कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक- १८ / २०२२ - २०२३** **दिनांक: शुक्रवार ०५ ऑगस्ट २०२२**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०६ ते १० ऑगस्ट २०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनाक | ०६/०८ | ०७/०८ | ०८/०८ | ०९/०८ | १०/०८ |
| पाऊस (मिमी) | १७.५ | ११.२ | १०.२ | १२.६ | ११.३ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२.८ | ३२.७ | ३२.६ | ३२.५ | ३२.३ |
| किमान तापमान (अं.से.) | २२.६ | २२.७ | २२.५ | २२.६ | २२.४ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८२ | ८० | ७८ | ७७ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७१ | ७२ | ७० | ६७ | ६८ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| वा-याची दिशा | २७५ | २८९ | ३०१ | २८७ | २६० |
| आकाश स्थिती | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| हवामान | | • प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, नागपूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या हवामान दिनांक ०५ - ०९ ऑगस्ट २०२२ दरम्यान सर्वत्र ठिकाणी हलका ते मध्यम पावसाची संभावना आहे.<br>• सतर्क ईशारा: दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस, विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता आहे. दिनांक ०६ - ०७ ऑगस्ट २०२२ रोजी तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता आहे. |
| सामान्य | | • वेळेवर पेरणी केलेल्या पिकाला ( कापुस, ज्वारी, मका) एक महिना झाला असल्यास शिफारसीनुसार वर खत द्यावे.<br>• सर्व पिकाचे नियमित सर्वेक्षण करावे व कीड व्यवस्थापनासाठी पिकावर स्वच्छ वातावरणात फवारणी करावी.<br>• जमिनीत वाफसा स्तिथी येताच आंतरमशागतीची कामे आटपावी.<br>• सोयाबीनच्या तण नियंत्रणासाठी, तणनाशकांची फवारणी करताना लेबल क्लेम शिफारसीनुसार स्वच्छ वातावरण असतांना फवारणी करावी. सोयाबीन पिकामध्ये २० दिवसांच्या पीक अवस्थे पुढे तणनाशकाचा वापर टाळावा.<br>• काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाउस पडल्याने बर्याच शेतात पाणी साचल्याणे पिकाचे नुकसान झाले आहे, अश्या ठिकाणी जमिनीत वाफसा स्तिथी येताच तेवढेच क्षेत्र पुनःपेरणी साठी तयार करून घावे व तेथे तीळ, तुर, सुर्यफुल, बाजरी किंवा एरंडी सारखे पिक पेरता येतील. पेरणीसाठी बाजरी + तुर (४:२), सुर्यफुल + तुर (२:१), तीळ + तुर (२:१) आंतरपीक पद्धतीसह उर्वरित खरीप पेरणी पूर्ण करावी.<br>• अर्धारबी करिता तुर पिकाची १५ सप्टेंबर पर्यत पेरणी करता येईल.<br>• अति पावसामुळे पिकाची पाने पिवळी पडली असल्यास जमिनीत वाफसा स्तिथी येताच फेरस अमोनियम सल्फेट प्रती १०० ग्रॅम किंवा पोटॅशियम नायट्रेट प्रती १५० ग्रॅम किंवा युरिया प्रती १०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | वाढ अवस्था | • जमिनीत वाफसा स्तिथी येताच सोयाबीनमध्ये आंतरमशागतीची कामे आटपावी.<br>• सोयाबीनच्या तण नियंत्रणासाठी, तणनाशकांची फवारणी करताना लेबल क्लेम शिफारसीनुसार स्वच्छ वातावरण असतांना फवारणी करावी. सोयाबीन पिकामध्ये २० दिवसांच्या पीक अवस्थे पुढे तणनाशकाचा वापर टाळावा.<br>• उशिरा पेरणी केलेल्या सोयाबीनमध्ये तण नियंत्रणासाठी १५-२० दिवसांच्या पीक अवस्थेत फवारणीच्या पर्यायी पर्यायामध्ये इमजिथापर १० टक्के एसएल प्रती १०-१५ मि.ली किंवा इमजिथापर + इमाझामॉक्स ७० टक्के डब्ल्यूजी प्रती २ ग्रॅम किंवा प्रोपाक्विझाफॉप २.५ टक्के + इमजिथापर प्रती ४० मि.ली. मोठे पाने असलेली तणनियंत्रणासाठी प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• पिकावरील पाने खाणा-या अळ्यांचा नियंत्रणासाठी ॲझाडिरॅक्टिन 300 पीपीएम प्रती ५० मि.ली प्रति १० लिटर पाण्यात फवारणी करावी. वरील आर्थिक नुकसानाची पातळी (४ विखुरलेली अळी प्रति मीटर लांबी) प्रादुर्भावासाठी क्लोरॅाट्रानिलिप्रोल प्रती १८ टक्के किंवा ५ मि.ली प्रती १८.५ मि.ली फवारणी करावी. तसेच स्वच्छ हवामानात इंडोक्साकार्ब १५.८ टक्के ईसी प्रती ६.७ मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ वातावरणात फवारणी करावी.<br>• सोयबीन पिकावरील गर्डल बीटलच्या रासायनिक नियंत्रणासाठी (आर्थिक नुकसानाची पातळीच्या वर, १० टक्के प्रादुर्भावित झाडे) क्लोरॅाट्रानिलिप्रोल १८.५ टक्के एससी प्रती ३.० मि.ली किंवा थायक्लोप्रिड २१.७ टक्के एससी प्रती १५ मि.ली किंवा इथिओन ५० टक्के ईसी ३० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात टाकून स्वच्छ वातावरणात फवारणी करावी. |
| कापुस | वाढ अवस्था | • जमिनीत वाफसा स्तिथी येताच कपाशीमध्ये आंतरमशागतीची कामे आटपावी.<br>• सर्वप्रथम पिक ९० दिवसाचे होईपर्यंत दर आठवड्यात पिकामध्ये गुलाबी बोंडअळीचे सर्वेक्षण करून मजुराच्या साहय्याने डोमकळ्या वेचून अळ्या सहित नष्ट कराव्या. व्यवस्थापनासाठी पिकामध्ये एकरी किमान दोन कामगंध सापळे लावावे. या सापळ्या मध्ये अडकलेले नरपतंग वेळो वेळी काढून नष्ट करावे तसेच २०-२५ दिवसातून एकदा वड्या (ल्युर) बदलावे. उपलब्धते प्रमाणे एकरी तीन टायकोकार्ड या प्रमाणे पात्या अवस्थेपासून दहा ते बारा दिवसाचे अंतर आणि ४ ते ५ वेळा समसमान अंतरावर पिकाच्या खालच्या बाजूला टाचाव्या.<br>• कपाशीवर ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून करावी किवां वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना पर्यावरणनिष्ठ व्यवास्थापनासाठी मेटारायझीयम अनिसोपली ५० ग्रॅम (२ x १०$^{८}$ सी.एफ.यु) ग्रॅम किंवा ब्यूव्हेरिया बॅसीयाना १.१५ टक्के (२ x १०$^{८}$ सी.एफ.यु) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून स्वच्छ वातावरण असतांना फवारणी करावी.<br>• फुलांमध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव ५ टक्के पर्यत आढळून आल्यास क्विनॅालफॉस २० टक्के एएफ २५ मि.ली किंवा क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही २५ मि.ली प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. प्रादुर्भाव ५ - १० टक्के पर्यत आढळून आल्यास थायोडीकार्ब ७५ टक्के भुक्टी २० ग्रॅम २० टक्के एएफ २५ मि.ली किंवा इंडोक्साकार्ब १५.८ टक्के |

| | | |
|---|---|---|
| | | ईसी प्रती १० मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ वातावरणात फवारणी करावी.<br>• वेळेवर पेरणी केलेल्या पिक एक महिन्याचे झाले असल्यास वाफसा स्थिती येताच रासायनिक नत्र खताची मात्रा द्यावी, त्यामध्ये बागायती बीटी कपाशी करीता ४० किलो नत्र प्रती हेक्टरी, बागायती हायब्रिड कपाशी करीता ३५ किलो नत्र प्रती हेक्टरी, कोरडवाहू बीटी कपाशी करीता ३० किलो नत्र प्रती हेक्टरी, देशी सुधारित कपाशी करीता २० किलो नत्र प्रती हेक्टरी.<br>• ओलावा संवर्धनाच्या उद्देशाने आणि शेतातील जास्तीचे पाणी काढून टाकण्यासाठी ३०-३५ दिवसांच्या अवस्थेत प्रत्येक दोन पीक ओळींनंतर डावर्याला दोरी बांधून, विशेषत: नंतर पेरलेल्या कपाशीच्या पिकामध्ये प्रत्येक दोन पीक ओळींनंतर संवर्धन करणे फायद्याचे आहे.<br>• ज्या शेतात पाणी साचले आहे ते त्वरित बाहेर काढावे. ज्या ठिकाणी कपाशी पिकात झाडे अति पाण्यामुळे मुलुल झाली आहेत अश्या ठिकाणी कॉपर ओक्सीक्लोराईड ५० टक्के डब्लूपी प्रती २५ ग्रॅम + युरिया १०० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून प्रधुर्भावग्रस्त ठिकाणी फवारणी करावी. |
| तुर | वाढ अवस्था | • जमिनीत वाफसा स्तिथी येताच तुरमध्ये आंतरमशागतीची कामे आटपावी. |
| मुग / उडीद | फुल अवस्था | • जमिनीत वाफसा स्तिथी येताच पिकात आंतरमशागतीची कामे आटपावी. |
| ज्वारी | वाढ अवस्था | • जमिनीत वाफसा स्तिथी येताच ज्वारी पिकात आंतरमशागतीची कामे आटपावी.<br>• पेरणीस एक महिना झाला असल्यास वाफसा स्थिती येताच रासायनिक नत्र खत ४० किलो प्रती हेक्टरी द्यावे. |
| मका | वाढ अवस्था | • पेरणीस एक महिना झाला असल्यास वाफसा स्थिती येताच रासायनिक नत्र खत ४० किलो प्रती हेक्टरी द्यावे.<br>• मका पिकावर नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी सर्वेक्षण करून ५ टक्के निबोळी अर्क फवारावा. |
| फळझाडे | लागवड | • फळझाडांची नवीन लागवड राहिली असल्यास ती या महिन्याचे सुरवातीस आटोपावी.<br>• आंबिया बहाराची संत्रा झाडांना येत्या दिवसात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पावसामुळे झालेल्या नुकसानापासून सावरण्यासाठी, तुटलेल्या फांद्या व फळझाडाच्या खोडास १ मीटर उंची पर्यंत बोर्डोपेस्ट लावावी. (१ कि मोरचूद - १ कि कळीचा चुना - १० लि पाणी).<br>• संत्रा व मौसंबी च्या मृग बहाराची फळे वाटण्याएवढी झाल्यावर शिफाशीप्रमाणे नत्र खताची मात्रा द्यावी. |
| भाजीपाला | पेरणी | • भाजीपाला शेतातील साचलेले अतिरिक्त पाणी काढून टाकावे.<br>• खरीप हंगामासाठी लागणाऱ्या मिरची, वांगे व टोमोटो, कांदा, फुलकोबी व इत्यादी पिकांची रोपवाटिका मध्ये रोपे तयार करून त्यांची पुर्नलागवण करतेवेळी बीजप्रक्रिया जसे ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• मिरची, टोमॅटो, वांगी आणि फुलकोबीच्या ४ ते ६ आठवडे जुन्या रोपांची पुनर्लावणी करावी. |
| पशु /जनावरे | - | • तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता असल्यामुळे जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>• जनावरांचे आतील व बाहेरील परोपकारी जीवजंतू पासून संरक्षण करावे.<br>• पावसाळ्यात बाहय आणि अंतर्गत परजीवींचे प्रमाण वाढते त्यामुळे पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घेऊन काळजी घ्यावी. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. | | |


नोडल अधिकारी
ग्रामीण कृषि मौसम सेवा, अकोला
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

संशोधन सहयोगी
ग्रामीण कृषि मौसम सेवा,
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला